# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. २६ ऑक्टोबर २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२९/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी ०८.४५ वा चे सुमारास, दर्शन हाईटस अपार्टमेंट, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी ०२.१५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रविराज जगदीश भुमकर, वय- २९ वर्षे, रा. ६३९/ दक्षिण कसबा, दर्शन हाईटस अपार्टमेंट, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) कृष्णकांत कटारे, २) यश कटारे, ३) स्वप्नील कटार, ४) एक नोकर, रा. माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे वडील फटाके उडवित असताना वरील आरोपीतांनी येऊन फिर्यादीचे वडीलांना आरेतुरे करत फटाके येथे का उडविता असे म्हणत वादविवाद होवून, वरील आरोपीतांनी फिर्यादीस हाताने मारहाण करुन, तसेच पेंटचा डबा व लोखंडी खुर्ची घेऊन फिर्यादीच्या पाठीत, डोक्यात व खांदयावर मारहाण केली. तसेच फिर्यादीची आई व काकु व वडील यांना आरोपीत क्रं. २ व ३ यांनी हाताने मारहाण केली व फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. तपास:- पोना/ ७३२ कामुर्ती - ८८०५०५१३०० |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६३०/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी ०८.४५ वा चे सुमारास, दर्शन हाईटस अपार्टमेंट, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी ०३.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | यश कृष्णकांत कटारे, वय- २३ वर्षे, रा. द लॅन्ड मार्क सोसायटी, प्लॉट नं. ९०४, गांधी नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) जगदीश भुमकर, २) रविराज भुमकर, दोघे रा. दर्शन हाईटस, दक्षिण कसबा, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत क्रं. १ हा हातात फटाके लावुन फेकले ते फटाका फिर्यादीचा भाऊ स्वप्नील याचे जवळ फुटले या कारणावरुन फिर्यादी हा आरोपीतांना विचारण्यास गेले असता, वरील आरोपीतांनी फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ यांना हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली. तसेच आरोपीत क्रं. २ याने त्याचे दुकानातुन लाकडी बांबु आणुन फिर्यादीस व भाऊ स्वप्नील यास मारहाण केली आहे म्हणून. तपास:- पोना/ ७३२ कामुर्ती - ८८०५०५१३०० |

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८७/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी २०.३० वा चे सुमारास, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी ०४.२१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मल्लिनाथ सिद्रामप्पा तोळनुर, वय- ४३ वर्षे, रा. ४/३०, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) विरपक्ष सिद्रप्पा तोळनुर, २) ओमकार विरपक्ष तोळनुर, दोघे रा. ४/३०, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर, ३) परशुराम सैद्दप्पा शिंदे, रा. भवानी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची पत्नी पार्वती हिस आपटे ज्वेलर्स येथुन घरी येण्यास उशीर झाल्याने फिर्यादी हे रागाच्या भरात बडबड करत पत्नीस घेवून येण्यासाठी घराच्या बाहेर जात असताना, यातील आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस त्याच्या मुलास शिवीगाळ देत आहे असे समजुन फिर्यादीस शिवीगाळ करुन, हाताने व लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी आरोपीत क्रं. १ याने अंगणात पडलेला लाकडी पाठ उचलुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले आहे. तसेच आरोपीत क्रं. २ व ३ यांनी शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली आहे म्हणून. तपास:- पोना/ ११५१ पाटील - ७३५०९८७३५६ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८८/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/१०/२०२२ रोजी २०.३० वा चे सुमारास, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी ०४.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विरपक्ष सिद्रप्पा तोळनुर, वय- ४८ वर्षे, रा. ४/३०, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मल्लिनाथ सिद्रामप्पा तोळनुर, वय- ४३ वर्षे, रा. ४/३०, मुनाळी बोळ, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे घरासमोर असताना फिर्यादीची मुलगी ही घरातील कचरा, कचरा कुंडीत टाकण्यासाठी जात असताना यातील वरील आरोपीताने तिस विनाकारण शिवीगाळ करत होता. त्यावेळी फिर्यादी हे वरील आरोपीतास तु मुलीस शिवीगाळ का करतो असे समजावुन सांगत असताना, वरील आरोपीताने फिर्यादीस शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी आरोपीताने अंगणात पडलेला लाकडी पाठ हातात उचलुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोना/ ११३१ माने - ७८८७९०४४९२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९०/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २३/१०/२०२२ रोजी २३.३० वा ते दि. २४/१०/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी २०.३६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रतीकांत रेवणसिध्द खंदारे, वय- ३९ वर्षे, रा. ५५८, पश्चिम मंगळवार पेठ, बाळीवेस, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ३०,०००/- रु काळया व लाल रंगाची हिरो एच एफ डिलक्स मोटारसायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी डब्ल्यु १८४८ ही घरासमोर पार्क केलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचुन, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोना/ ६२८ जमादार - ९९२३३३१२१२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५३१/२०२२ भादंविसक ४९८(अ),४९४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३०/०६/२०१० रोजी पासुन ते दि. २३/०८/२०२२ रोजी पर्यंतचे दरम्यान, फिर्यादीचे सासरी, कर्नाटक |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी २०.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रुकय्या अताउल्ला जालवाद, वय- ३० वर्षे, रा. ६६४ ब, स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, विमानतळ जवळ, कुमठा नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अताउल्ला जालवाद- पती, २) नजीरा जालवाद- सासु, ३) मोहम्मद उमर मशाकसाब जालवाद- सासरे, ४) अमानउल्लाह- दिर, ५) सनाउल्लाह- दिर, ६) आरोपीत क्रं. १ याची दुसरी पत्नी हलिमा जालवाद, सर्व रा. ४५५, यत्तरगुड्द ईदगाह गल्ली, नरानी मस्जिद जवळ, रामपुर रबकवी बनहट्टी, बागलकोट, राज्य- कर्नाटक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे लग्न झालेपासुन ते आजतागायत यातील वरील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस अनेक प्रकारे शाब्दीक, भावनीक, मानसीक व शारिरीक त्रास देवून जाच हाट करुन, फिर्यादीस जर तुला आमच्याकडे नांदायचे असेल तर घराचे बांधकाम व चारचाकी गाडी विकत घेण्यासाठी पाच लाख रुपये घेवुन ये नाहितर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून, फिर्यादीस उपाशी पोटी कोंडुन ठेवून, फिर्यादीचा मानसिक व शारिरीत छळ करुन त्रास देवून जाचहाट केला आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीच्या संमतीविना दुसरे लग्न करुन आरोपीत क्रं. ६ हिच्या सांगण्यावरुन देखील फिर्यादीचा छळ केला आहे म्हणून. तपासः- पोना/ १२०४ मणुरे - ८६६८७२६०३७ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९४/२०२२ भादंविसक २७९, ३०४(अ),३३७,४२७, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी १७.१५ वा चे सुमारास, दहिटणे फाटा, हैद्राबाद रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २५/१०/२०२२ रोजी २३.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अजय दुर्गम गायकवाड, वय- २४ वर्षे, रा. चव्हाण वस्ती, फ्री कॉलनी नं. ०६, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | इर्टिका वाहन क्रं. एम एच २५ ए डब्ल्यु ०५२३ चा चालक नाव पत्ता माहित नाही |
| **मयताचे नाव** | : | आदर्श विठ्ठल जाधव, वय- २५ वर्षे, रा. सेटलमेंट, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचे मालक आदर्श जाधव असे मिळुन मोटारसायकल क्रं. एम एच १३ सी वी ११९४ एच एफ डिलक्स वरुन वरील ठिकाणच्या हॉटेलमध्ये जेवण करुन घरी जात असताना, सोलापूर च्या दिशेने येत असताना पाठीमागुन वरील आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे हयगयीने, अतिवेगाने, निष्काळजीपणाने चालवून धडक दिल्याने त्यात फिर्यादीच्या पाठीला, कमरेला मार लागुन दुखापत केली. तसेच आदर्श जाधव यास गंभीर दुखापत होवून त्याचे मरणास कारणीभुत ठरला आहे. तसेच मोटारसायकल तुटुन फुटुन सुमारे पाच हजार रुपये चे नुकसान केले आहे म्हणून. तपासः- पोना/ १०७२ चव्हाण - ९८२३०१९३२६ |